संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# निर्णयांचा नुसता धडाका नको; अंमलबजावणी हवी

राज्यात रखडलेले अनेक प्रकल्प आहेत. ते मार्गी लागले पाहिजेत. नव्या सरकारने मुंबईतल्या दोन्ही मेट्रो प्रकल्पांना मंजुरी देण्याची जी तातडी दाखवली ती योग्यच आहे. मात्र त्याच्याबरोबरीने ग्रामीण भाग जो मूलभूत सुविधांपासून वंचित आहे, त्याचादेखील गांभीर्याने विचार झाला पाहिजे. एकट्या मुंबईच्या मेट्रो प्रकल्पांवर तब्बल पंचेचाळीस हजार कोटींच्या खर्चाला मंजुरी दिली जात होती त्याचवेळेला कोल्हापूरसारख्या भागात प्रवाशांना हैराण करणाऱ्या टोलनाक्यांवर महिलांनी उत्स्फूर्तपणे आंदोलन सुरू केले होते. या दोन घटना प्रातिनिधीक स्वरूपाच्या आहेत आणि यावरून एकूणच राज्यातल्या असमतोल विकासाचे दर्शन घडते. केवळ शहरांवर लक्ष केंद्रित न करता ग्रामीण भागाचाही विकास महत्त्वपूर्ण ठरतो. अनेक मूलभूत आणि पायाभूत सुविधांपासून महाराष्ट्रातली साठ ते सत्तर खेडी वंचित आहेत. पुरेसे रस्ते नाहीत. जलसिंचनाची तर फारच भीषण अवस्था आहे. वीज पुरवठ्याचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. शाळांची दुरवस्था, आजारी पडलेली आरोग्य केंद्रे अशा अनेक गोष्टी आज ठिकठिकाणी पाहायला मिळतात. याचा तितक्याच गांभीर्याने विचार झाला पाहिजे. अन्यथा पुन्हा एकदा शहरी भागांवर भरमसाठ खर्च होईल. आणि ग्रामीण भाग मात्र दुर्लक्षित राहील. नव्या सरकारने काही निर्णय घ्यायला सुरुवात केली आहे. मात्र यातले बरेचसे निर्णय शहरी भागाशी निगडीत असल्याचे पहायला मिळते.यामध्ये पुणे,ठाणे,नागपूर या मोठ्या शहरांचा अधिक विचार झालेला दिसून येतो. याउलट आदिवासी भागातील कुपोषण, जवखेडासारख्या प्रकरणाकडे होत असलेले दुर्लक्ष तीन महिने उलटूनही या हत्याकांडातले आरोपी सापडू शकलेले नाहीत. अशा काही मुद्द्यांचा जर विचार केला तर ग्रामीण भाग आणि शहरी भाग यातली विकासातली तफावत बरीच मोठी असल्याचे पाहायला मिळेल. आतापर्यंतच्या आघाडी सरकारने हाच प्रकार केला. सत्तर हजार कोटी सरकारी तिजोरीतून खर्च झाल्याचे दाखवले गेले, पण ग्रामीण भागातल्या पाण्याच्या समस्या सुटू शकल्या नाहीत. शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळू शकलेले नाही. आजदेखील महाराष्ट्राच्या सत्तर टक्के भागामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. शुध्द आणि पुरेसे पाणी ही महाराष्ट्राच्या दृष्टीने फार मोठी समस्या आहे. अनेक जिल्हा आणि तालुक्यांच्या ठिकाणी नळाला तीन तीन दिवसांनी पाणी येण्याचे प्रकार सुरू आहेत.अगदी पुणे, नाशिक या शहरातदेखील पाणीटंचाईचे चटके जाणवू लागले आहेत..

### निर्णयांवर घूमजाव नको

ज्या वेगाने मुंबईच्या दोन मेट्रो प्रकल्पांना राज्य सरकारने मंजूरी दिली त्या वेगाने त्यांची कामे पूर्ण झाली पाहिजेत. दुर्दैवाने आतापर्यंतचा अनुभव तसा नाही खरे तर हे सगळे मेट्रो प्रकल्प प्रत्यक्षात दहा वर्षांपूर्वीच कार्यान्वित व्हायला हवे होते. आधीच उशीर झालेले हे प्रकल्प आता प्रत्यक्ष पूर्ण व्हायला किती वर्षे घेतील, हे कोणी सांगू शकत नाही. वरळीत सागरी सेतूचे काम असेच दहा वर्षे रखडले होते. मेट्रो प्रकल्प जो २००९ ला पूर्ण व्हायला हवा होता, त्याला २०१४ साल उजाडले. म्हणूनच मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय महानगराची जगातल्या मोठ्या शहरांशी तुलना करताना हे सर्व प्रकल्प मुदतीमध्ये पूर्ण होणे आवश्यक ठरते. एकीकडे मुंबईला अशा वेगाची आवश्यकता असताना दुसरीकडे सध्याच्या उपनगरीय रेल्वेचा रोजचा खेळखंडोबा सुरू राहावा हे तितकेच खेदजनक ठरते. सध्या तर मध्य रेल्वेवर रोज गोंधळ सुरू आहे. गेल्या तीन-चार महिन्यांपासून मध्य रेल्वेच्या उपनगरीय गाड्यांचे वेळापत्रक हे बिघडले ते अजूनही दुरुस्त झाले नाही. आता तर त्यात नव्या वेळापत्रकाची भर पडली आहे. मुंबई ही केवळ दोन तास विश्रांती घेणारी नगरी मानली जाते. अशावेळी चर्चगेट किंवा व्हीटीहून पहिली गाडी जर पहाटे सव्वाचार किंवा साडेचारला सुटली आणि कल्याणहून शेवटची गाडी अकराला निघाली तर दुसऱ्या पाळीच्या कामावरून सुटणाऱ्या कामगारांचे मोठेच हाल होऊ शकतात. याबाबत तातडीने दुरुस्ती केली गेली पाहिजे. अर्थात उपनगरीय रेल्वेसेवेबाबत अनेक अडचणी आहेत रेल्वेस्थानकांवर अनेक समस्यांना प्रवासी तोंड देत असतात. बंद पडलेली कूपन पंचिंगची मशिन्स किंवा ॲटोमेटिक तिकीट, टेंडर मशिन्समध्ये असलेला बिघाड या गोष्टींचाही वेळेची कसरत करणाऱ्या मुंबईकरांना सामना करावा लागतो. म्हणूनच प्रकल्प मार्गी लावत असताना केवळ धडाधड मंजुऱ्या देऊन चालणार नाहीत. त्याबरोबर त्यांच्या अंमलबजावणीकडे कटाक्षाने लक्ष द्यावे लागेल.

### मंत्रिमंडळात समन्वय हवा

खरे सांगायचे तर सरकारने सुरू केलेली कामे अजूनही लोकांचा विश्वास मिळवू शकलेले नाहीत. कारण नव्या सरकारमध्ये पुरेसे मंत्री आलेले नाहीत. मंत्रिमंडळामध्ये सुसंवाद निर्माण झालेला नाही. प्रत्यक्ष मुख्यमंत्री यांनी केलेल्या विधानाविरुध्द भूमिका घेण्याचे काम बऱ्याचवेळेला अन्य ज्येष्ठ मंत्र्यांकडून होत आहे. एलबीटीवरून सरकारने मांडलेली कोलांटउडी हा त्याचाच नमुना ठरतो. स्वत: देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्र्यांनी एलबीटी रद्द करण्याचे आश्वासन दिले आहे. आता त्यांच्याच विदर्भाचे सुधीर मुनगुंटीवार या अर्थमंत्र्यांनी त्यामध्ये कोलदांडा घातल्याचे दिसून येते यापूर्वीसुध्दा त्यांनी राज्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत श्वेतपत्रिका काढली जाईल असे परस्पर जाहीर केले. ज्या ज्या मुख्यमंत्र्यांना सावरून घ्यावे लागले. एलबीटीबाबतही असेच होणार आहे. सध्या मुनगुंटीवार मुख्यमंत्री किंवा कुठल्याही अन्य मंत्र्यांपेक्षा अधिक वादग्रस्त विधाने करीत आहेत. त्यांना ज्युनियर असलेले देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्याने ते आपली अस्वस्थता लपवू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून विविध कामांची घोषणा करताना आणि मंजुरी दिलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीकरता पहिल्यांदा सरकारमध्ये समन्वय निर्माण करावा लागेल.एकमेकांच्या खात्यामध्ये ढवळाढवळ होणार नाही पण कामे मार्गी लागतील, याची दक्षता घ्यावी लागेल. केवळ निर्णयांचा धडाका लावला म्हणजे सरकार कामाला लागले असे होत नाही. त्याचे दृष्य परिणाम लोकांना जाणवले पाहिजेत. आणि आता खरोखरच सरकार कामाला लागले आहे, असा विश्वासही निर्माण झाला पाहिजे.